**नियमित दिवाणी दावा ५७/२००८**
**उत्तम घोडके / विश्वंभर घोडके**

## निशाण १२० खालील आदेश

**१.** प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.१ तर्फे आदेश १४ नियम ५ नुसार अर्जात नमुद अतिरिक्त मुददे निश्चित करण्यायाकामी दिलेला आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले.

३. प्रतिवादी तर्फे श्री एस.एस. शहा. तसेच वादी तर्फे श्री. एस.ए.फुटाणे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्र.वा तर्फे श्री. एस.एस. शहा यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जात नमुद दोन्ही मुददे हे दाव्याच्या अंतिम निकालाकामी महत्वाचे असून सदर मुददे निश्चित करुन त्यावर निष्कर्ष नोंदविणे महत्वाचे आहेत. त्यामुळे अर्ज मंजूर करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. याउलट वादीचे विधिज्ञ श्री फुटाणे यांनी निशाण क्रमांक. ६२ वर नोंदविलेले मुददे हे पुरेसे असून अर्जात नमुद मुददयांचा निशाणी ६२ मधील मुददामध्ये अंतर्भाव झालेला आहे त्यामुळे नविन मुददा काढण्याची आवश्यकता नाही असे प्रतिपादन केले. सबब अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. अर्ज, म्हणणे व युक्तीवाद यावरुन खालील मुददे (वादप्रश्न) निर्णयाकरीता उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारण मिमांसे सह मी खालील प्रमाणे देत आहेत.

| **अ.क्र.** | **मुददे (वादप्रश्न)** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रतिवादींनी अर्जात नमूद केल्या अनुषंगाने मुददे निश्चित करणे आवश्यक आहे काय ? | होकारार्थी |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

## मुददा क्रमांक १ करीता

५. माझे पूर्वपिठासन अधिकारी नि. ६२ वर खालील मुददे निश्चित केलेले आहेत.
१. दावा मिळकती हया वादी व प्रतिवादींच्या एकत्र हिंदु कुंटूबांच्या व

वाडवडीलार्जीत असल्याचे वादी सिध्द करतो काय ?

२. वादी हा दावा मिळकतीमध्ये त्याचा हिस्सा असल्याचे सिध्द करतो काय? असल्यास कितवा हिस्सा ?

३. दाव्यास आवश्यक पक्षकार सामिल केले नाही या तत्वाची बाधा ये५ते काय ?

४. दाव्यास सर्व वडीलोपार्जीत मिळकती समाविष्ठ न केल्याची बाधी येत काय ?

५. वादीस दावा मिळकतीमध्ये वाटप व त्याचा स्वतंत्र हिस्सयाचा ताबा मिळण्यास पात्र आहे का?

६. काय आदेश व हुकूमनामा ?

६. **वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे** — १. सन १९९० साली वादी व प्रतिवादीच्या वडिलांनी एकत्रित कुटुंबाच्या सर्व मिळकतीचे वाटप केले होते काय ? ही बाब वादी शाबित करतात काय ?

२. वादीने केलेले वैकल्पीक मागणीस वादी पात्र आहे काय ? हे मुददे कायम करण्याबाबत विनंती केलेली आहे.

७. दावा व कैफियत मधील कथने, उपलब्ध कागदपत्रे व पक्षकारांने शपथेवर सांगितलेले तथ्ये या सर्वाचा विचार मुददे निश्चिीत करताना आवश्यक आहे. वादीने दावा कलम ४ मध्ये असे कथन केले आहे की, '१९९० मध्ये वादी व प्रतिवादीचे वडील थकले व त्यांनी स्वत:हून एकत्र कुटुंबातील मिळकतीची वाटणी करुन दिली. व त्या वाटणी मध्ये वडील लक्ष्मण यांनी गुळोळी येथील जमिन (२ एक्कर)जमिन स्वत: कडे ठेवून घेतली व त्याचे वाटप केले नाही. व मी हयात असे पर्यंत कोणाकडून ही जमिन कसून घेणे किंवा स्वत: कसेन व माझा मृत्यूनंतर माझा ४ ही मुलांनी वादी व प्रतिवादी यांनी वाटून घ्यावी असे सांगितले', तसेच वादी ने विनंती परिछेदामध्ये दावा कलम १ अ मधील मिळकतीचे वाटप करुन वादीचा १/४ अंश हिस्सा पृथक होवून मिळावा तसेच ब वैकल्पीक रित्या दावा कलम १ अ मधील मिळकतीचे पूर्वीचे वाटप सरसनिरस मानाने झालेले नसल्याने व सर्वाच्या संमंतीने नसल्याने ते रदद् करुन फेरवाटप करुन वादीच्या १/४ हिस्साचा कब्जा मिळावा अशी विनंती केलेली आहे.

८. प्रतिवादीने निशाण क्र. ६० वर त्यांचे म्हणणे कैफियत दाखल केलेले आहे. सदर कैफियतीचे परिछेद क्र.८ मध्ये वादीचे वरील कथने स्पष्ट पणे नाकारले

असल्याचे दिसून येते. प्रतिवादीनी वादी प्रतिवादी लक्ष्मण यांच्यात आजतागायत कधीच सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही त्यामुळे दाव्यात नमूद केल्याप्रमाणे तोंडी वाटप कधीच झाले नाही व नव्हते. तसेच पूर्वी वाटप झाले नसल्याने पूर्वीचे वाटप रदद् करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे कथन करुन वादीची कथने प्रतिवादींनी नाकारल्याचे दिसून येते.

९. निशाणी ६२ वर मुददयांचे अवलोकन केले असता असे दिसून येते कि, वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबामध्ये पूर्वीचे वाटपासंदर्भात त्याच प्रमाणे वादीने केलेल्या वैकल्पीक मागणीच्या अनुषंगाने स्पष्ट पणे मुददा कायम झाल्याचा दिसून येत नाही. वादीने पूर्वीच्या वाटपाविषयी विशिष्ट अशी घटना, तथ्य,नमुद केलेले आहे. व प्रतिवादींनी ते नाकारले आहे. यावरुन वादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे पूर्वीच्या वादी व प्रतिवादीच्या दावा मिळकती संदर्भात वाटपा विषयी मुददा आवश्यक असल्याचे दिसून येते. दावा गुणदोषावर निर्णीत करताना या तथ्याबाबत मुददा काढणे आवश्यक आहे . यामुळे दाव्याच्या अंतिम निकाला कामी मदतच होईल. सबब प्रस्तुत दावा गुणदोषावर निर्णीत होण्यासाठी त्यासंदर्भात मुददा काढणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणून मुददा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देत असून मुददा क्र.२ च्या निष्कर्षापोटी खालील आदेश पारीत करीत आहे. —

**<u>आदेश</u>**

**१. वादीचा निशाणी १२० वरील अर्जाच्या अनुषंगाने खालील अतिरिक्त मुददे काढण्यात येतात.**

**३. <u>मुददा क्र.६ —</u>**

**दावा कलम १अ मधील दावा मिळकती व्यतिरिक्त इतर दावा मिळकतीचे वाटप झाले होते काय? हे वादी सिध्द करतात काय ?**

**<u>मुददा क्र.७ —</u>**

**वादीने केलेल्या वैकल्पीक मागणीस वादी पात्र आहेत काय?**

**४. वरील प्रमाणे निशाणी ६२ वर मुददा क्र. ६ व ७ हे निश्चित करण्यात येतात. पूर्वी निश्चित केलेले मुद्दा क्रमांक ५ यास मुद्दा क्र. ८ हा अनुक्रमांक देण्यात येतो.**

**५. पक्षकारांनी जरुर वाटल्यास नविन मुद्यांवर पुरावा द्यावा.**

**दिनांक :— १५/०१/२०१८**

**शरद. ना. गवळी**
**दुसरे सह दि.न्या.क.स्तर, अक्कलकोट**